Vol II Issue VIII Feb 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 8, Feb. 2013
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.net

**ORIGINAL ARTICLE**

# अध्यापक शिक्षणापुढील सर्वसामान्य आव्हाने

**माशेरे बाळासाहेब धोंडीभाऊ**

सी.के.गोयल महाविद्यालय, दापोडी, पुणे

गोशवारा :

बदलत्या काळाबरोबर व्यक्तीच्या गरजा आणि समाजाच्या अपेक्षासुध्दा बदलतात. शिक्षण प्रक्रिया बदलायची झाल्यास सुरुवात ही अध्यापक शिक्षणापासून करावी लागते. कारण शिक्षण प्रक्रियेत अध्यापक व त्याचे शिक्षण या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. यथा शिक्षक तथा विद्यार्थी या नात्याने उत्तम विद्यार्थी घडवायचा असेल तर सर्वप्रथम उत्तम शिक्षक घडविणे आवश्यक आहे. पूर्वी अशी समजूत होती की कवी व कलाकाराप्रमाणे शिक्षक हा जन्मावा लागतो पण तसे नाही आवश्यक ते शिक्षण व प्रशिक्षण देऊन चांगले शिक्षक तयार करता येतात.

## *प्रस्तावना :*

रविंद्रनाथ टागोर यांच्या भाषेत विद्यार्थ्यांशी संवाद साधणाऱ्या शिक्षकांची गरज आहे व तसे घडविणारे शिक्षक हे अभ्यासक्रमातून निर्माण होणे आवश्यक आहे.

शिक्षकांच्या गुणवत्तेवर शिक्षणाची गुणवत्ता अवलंबून असते. शिक्षकांची गुणवत्ता वाढीसाठी प्रशिक्षण मग ते सेवापूर्व असो किंवा सेवांतर्गत असो. प्रशिक्षणातून, कार्यकुशलता वाढीस लागते. नाविन्यपूर्ण गोष्टी अध्यापन तंत्र, पध्दती, माहिती आत्मसात करता येतात. भविष्यकाळ नेहमी आव्हाने घेऊनच येत असतो. आज आपण सूचनाक्रांतीच्या युगात वास्तव्य करीत आहोत. प्रसार माध्यमांमुळे जगातील विविध राष्ट्रांच्या भौतिक मर्यादा विलय पावल्या असून जग एखाद्या लहान खेड्यासारखे झाले आहे. ज्ञानाचा विस्फोट झालेला आहे. अशा स्थितीत भावी नागरिकांना घडविणाऱ्या शिक्षकांना घडविण्यासाठी अध्यापक शिक्षणात नेमक्या कोणत्या बाबींचा समावेश करावा हे मोठे आव्हान आहे. प्रा. हर्षवर्धन कडेपूरकर यांचा महाराष्ट्र टाईम्स मध्ये ५ सप्टेंबर २००८ रोजी प्रसिध्द झालेला लेख वाचण्यात आला. त्यातील एक अनुभव अगदी विचार करायला लावणारा होता. त्यांना प्रवास करताना एक तरुण भेटला व त्यांच्या शर्टवर खालील वाक्य होते. "I was born Intelligent But my Education Ruined me!' हे वाचल्यावर त्यांनी त्या तरुणाला विचारले मी पण एक शिक्षक आहे. यात शिक्षक म्हणून माझा किती हातभार आहे तर तो म्हणाला. नाही सर तुम्ही तर..... त्याने खोटे बोलू नये म्हणून त्यांनी लगेच विषय बदलला. या ओळी सरांच्या मनातून जाईनात. ज्या कोणी हा मजकूर लिहिला असेल ज्याला सूचला असेल त्याच्या मनात काय असेल? शिक्षणाबद्दलचा हा सूर कशामुळे? कोणाचे कुठे चुकते? शैक्षणिक आकृतीबंधाबद्दल नाराजी? का अंमलबजावणीत गडबड? शैक्षणिक सोयी सुविधांची कमी? का वातावरण अयोग्य?

अभ्यासक्रम उद्दिष्टे, अभ्यासक्रमाचा आशय, साहित्य पध्दती तंत्रे, परीक्षा पध्दती या प्रमुख घटकांचा सर्व शैक्षणिक आकृतीबंधात विचार होतो. या आकृतीबंधाच्या मुळाशी असलेला सैध्दांतिक किंवा तात्विक भूमिका, दृष्टीकोन हा वेगळाच मुद्दा या बद्दल विद्यार्थी, शिक्षक यांची मते काय आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न दिसत नाही. थोडक्यात अभ्यासक्रमाचा आराखडा हा कोणीतरी लादत असतो.

कसदान अध्यापन हवे, शैक्षणिक वातावरण हवे, मार्गदर्शक ठरेल असे काही दिशादर्शक हवे. बदलत्या काळाच्या गरजांचा व आव्हानांचा यशस्वीपणे सामना करणारा विद्यार्थी निर्माण करायचा असेल तर अभ्यासक्रमात आणि शैक्षणिक धोरणात बदल करणे क्रमप्राप्त ठरते. अभ्यासक्रमात बदल करताना जागतिक, राष्ट्रीय प्रादेशिक व स्थानिक स्तरांवरील बदल विचारात घ्यावे लागतात.

आजचे विद्यार्थी बहुश्रुत होत आहेत. विद्यार्थ्यांना घरच्या घरी संपर्क साधनामुळे नवे ज्ञान विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या मदतीशिवाय मिळू लागले आहे. अशा विद्यार्थ्यांना शिकवणारा शिक्षक एकमार्गी असून चालणार नाही तर त्याला बहुमार्गी बनावे लागेलच. त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. उत्कृष्ट व पध्दतशीर आणि अद्ययावत प्रशिक्षण शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे हित सांभाळू शकेल.

शिक्षक प्रशिक्षणासंदर्भात विचार करण्याची खरी सुरुवात झाली झाली ती सर जॉन सार्जट यांच्या अध्यक्षतेखाली १९४४ साली नेमलेल्या आयोगाने. या आयोगाच्या अहवालामध्ये सर्व समावेशक शिक्षण निर्माण करण्यासाठी शिक्षकांच्या पुरेशा प्रशिक्षण संस्था स्थापल्याऽपाहिजे अशी शिफारस केली व त्यामध्ये शिक्षक प्रशिक्षणावर भर देण्यात आला.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षक प्रशिक्षणात लक्षणीय बदल घडून आले. शिक्षणाच्या विविध क्षेत्रात अध्यापन प्रक्रिया सुधारण्याचे प्रयत्न होत आहेत. शिक्षक शिक्षणात लोकशाहीनिष्ठ जीवनमुल्यांकडे लक्ष दिले जात आहे. तसेच पूर्वीच्या शिक्षक प्रशिक्षणाची जागा आता शिक्षक शिक्षणाने घेतली आहे.

प्रचलित शिक्षक शिक्षणातील सर्वसामान्य आव्हाने अध्यापक शिक्षणासमोर सद्यस्थितीमध्ये अनेक सर्वसामान्य आवहाने उभी आहेत ती समर्थपणे पेलली तर खऱ्या अर्थाने शिक्षक प्रशिक्षणात सुधारणा होऊन शिक्षणव्यवस्थेत बदल सकारात्मक घडून येतील.

**Title :**अध्यापक शिक्षणापुढील सर्वसामान्य आव्हाने
**Source:Golden Research Thoughts [2231-5063] माशेरे बाळासाहेब धोंडीभाऊ yr:2013 vol:2 iss:8**




*१. आर्थिक अडचणींचे आव्हान :*

नवीन अध्यापक महाविद्यालयांना अनुदान नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कावर ती महाविद्यालये चालवली जातात. शिक्षण शुल्क ठरविण्यासाठी राज्य स्तरावर शिक्षक शुल्क समितीची स्थापना करण्यात आली आहे. परंतु काही महाविद्यालय समितीची दिशाभूत करुन जास्त शुल्क मंजूर करवून घेत नसतात. परंतु भविष्यात अधिक शुल्क भरुन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या महाविद्यालयांच्या संख्यात्मक वाढीमुळे कमी होईल व ही महाविद्यालये आर्थिक अडचणीत सापडतील. या बाबींचा सर्वात मोठा फटका विनाअनुदानित तत्वावरील जुन्या महाविद्यालयांना बसेल कारण त्यांचा खर्च वाढता राहील तर उत्पन्न कमी होत जाईल.

*२. विशेष अध्यापक निर्माण करण्याचे आव्हान :*

विभिन्न प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेऊन त्यानुसार अध्यापन करण्यास सक्षम असलेला अध्यापक घडविणे महत्त्वाचे आहे. कमी ऐकायला येणे, दृष्टीदोष, शारीरिक अपंगत्व, मतीमंदत्व, अध्ययन अक्षम इत्यादी उणीवा असलेले विद्यार्थी वर्गात असू शकतात. परंतू आता या शारीरिक उणिवांना व्यंग न मानता त्यास आव्हान मानले जाते व हे आव्हान पेलण्यास विद्यार्थ्यांस सक्षम बनविण्याची जबाबदारी शिक्षकांवर येते. त्यासाठी विशेष प्रशिक्षण घेण्यासाठी शिक्षकांना तयार करणे हे महत्त्वाचे आहे.

*३. गुणवत्ता निर्माण करण्याचे व ती टिकवून ठेवण्याचे आव्हान :*

अध्यापन शिक्षणातील अभूतपूर्व अशा संख्यात्मक वाढीमुळे गुणवत्ता निर्माण करण्याचे व ती टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. भविष्यकाळासाठी सतत सतर्क रहावे लागते. विद्यार्थ्यांसाठी वेळ देणारे शिक्षक, आपले अध्यापन कार्य मनापासून, तळमळीने शिकवणारे शिक्षक हवे आहेत. शिवाय त्यांची ही मानसिकता टिकवून ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहेत.

*४. बेकारीचे आव्हान :*

संख्यात्मक वाढीमुळे  बेकारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे व भविष्यात ती आणखी वाढणार आहे. त्यामुळे अध्यापक शिक्षणास केवळ नोकरीसाठी पात्र असलेले उमेदवार तयार करुन चालणार नाही. तर शिक्षण व इतर क्षेत्रात स्वयंरोजगार निर्माण करु शकणारे उमेदवार तयार करावे लागणार आहे. जागतिकीकरणाचा फायदा घेऊन ज्या देशात शिक्षकी पेक्षा स्वीकारण्यास कमी तरुण उत्सुक आहेत. अशा देशात नोकरी मिळवू शकतील असे उमेदवार तयार करण्याचे मोठे आव्हान आज अध्यापक शिक्षणासमोर उभे आहे.

*५. अभिक्षमता व समर्पणासाठी भावना विकसित करण्याचे आव्हान :*

राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेने शिक्षकी पेशाची कार्यक्षेत्रे तीन प्रकारात विभागली आहेत. त्यातील पहिला प्रकार हा क्षमता क्षेत्रे असून यात १० प्रकारच्या क्षमतांचा समावेश आहे. अध्यापन क्षमता, संप्रेषण क्षमता, व्यवस्थापन क्षमता व मूल्यमापन क्षमता इत्यादींचा समावेश आहे. बांधिलकीच्या क्षेत्रात ५ प्रकारच्या बांधीलकी समाविष्ट असून विद्यार्थ्यांच्या संदर्भात, सामाजिक, व्यावसायिक बांधिलकी त्यामध्ये प्रमुख आहेत. तिसरे क्षेत्र हे कामगिरीचे असून वर्गातील कामगिरी, विद्यालयातील कामगिरी व सामाजिक क्षेत्रातील कामगिरी यांचा समावेश आहे. या सर्व क्षमता व अभिव्यक्तींनी युक्त अध्यापक तयार करणे हे फार मोठे आव्हान आहे.

*६. सर्जनशीलतेचे संवर्धन करण्याचे आव्हान :*

मानवी जीवनात सर्जनशीलतेचे महत्त्व अतिशय आहे. शिक्षक सर्जनशील असेल तर विद्यार्थी सर्जनशील राहील. सर्जनशीलता ही बुध्दिमत्तेपेक्षाही महत्त्वाची क्षमता आहे. सर्जनशीलतेचे जतन आणि संवर्धन केले नाही तर ती कालांतराने नष्ट होते ही सर्जनशीलता संवर्धित करण्याचे आव्हान आहे.

*७. सुयोज्य मनुष्यबळ निर्मितीचे आव्हान :*

तज्ञ व सुसंस्कारित मनुष्यबळ हे कोणत्याही देशाच्या विकासाची मुलभूत आवश्यकता असते, सर्वच क्षेत्रात देशांच्या गरजांच्या अनुरुप असे मनुष्यबळ निर्माण

करण्याची जबाबदारी शिक्षकाची आहे. म्हणून सुयोग्य प्रकारचे मनुष्यबळ विकसित करण्यास सक्षम असलेला शिक्षक घडविण्याचे महत्त्वपूर्ण आव्हान अध्यापक शिक्षणासमोर आहे.

### *८. अपेक्षांच्या विस्फोटांचे आव्हान :*

भारताचे भवितव्य वर्गा-वर्गातून घडत आहे हे भारतीय शिक्षण आयोगाच्या अहवालात नमूद केलेले वाक्य शिक्षणाकडून देशाला किती अपेक्षा आहेत याचे द्योतक आहे. या अपेक्षा शिक्षणाकडून पूर्ण व्हावयाच्या असतील तर त्यासाठी सर्व प्रकारच्या अभिक्षमता व अभियोग्यता असलेला समर्पित शिक्षक अध्यापक शिक्षणातून घडला पाहिजे.

### *९. बदलत्या सामाजिक परिस्थितीबरोबर समायोजन साधण्याचे आव्हान :*

आपण राहतो त्या समाजाबरोबर समायोजन साधण्याचे कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण व्हावे ही बाब अपेक्षित आहे. कोणत्याही समाजाचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्ये म्हणजे त्या समाजाची परिवर्तनशीलता होय. सामाजिक स्थिती व भविष्याचा वेग अशा स्थितीत अध्यापक शिक्षकास झपाट्याने बदलणाऱ्या सामाजिक स्थितीबरोबर समायोजन साधण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे.

### *१०. स्वत:ची संस्कृती टिकवून ठेवण्याचे आव्हान :*

जागतिकीकरणाच्या लाटेत अनेक गोष्टी वाहून जात आहेत. आपली स्वत:ची संस्कृती ही प्रत्येक राष्ट्राचा अनमोल ठेवा आहे. तिचे जतन आणि संवर्धन शिक्षणाच्या माध्यमातून व्हावे हे अपेक्षित आहे.

एका पिढीचे ज्ञान, विचार व संस्कर दुसऱ्या पिढीपर्यंत पोहचविण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण दुवा म्हणजे शिक्षक होय असे महत्त्वपूर्ण विचार डॉ.राधाकृष्णन यांनी शिक्षकांबद्दल व्यक्त केले आहे. उदार मनोवृत्तीसोबत शिक्षकाच्या मनात स्वत:च्या संस्कृतीबद्दल जिव्हाळा आणि आदर असणे आवश्यक आहे. अर्थातच आपल्या संस्कृतीचे पाईक होण्याची पात्रता असलेले शिक्षक घडविणे हे सुध्दा एक महत्त्वपूर्ण आव्हान अध्यापक शिक्षणासमोर आहे.

या सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी करावयाचे प्रयत्न.

केंद्र व राज्य सरकारने अध्यापक महाविद्यालयाबाबत ठोस भूमिका घेणे महत्वाचे आहे. शिवाय गाजरगवनासारखी निर्माण झालेली अध्यापक विद्यालये व त्यांची संख्या आटोक्यात असणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या परिस्थितीत ज्या ठिकाणी सुयोग्य वातावरण, पुरेशी यंत्रणा उपलब्ध नसतानाही ही महाविद्यालये रातोरात उभी राहतात त्यांची गुणवत्ता कोणती? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यासाठी स्थानिक प्रशासनापर्यंत प्रशासक हवा शिवाय काही कडक नियम हवेत. शुल्काच्या बाबतीत एकवाक्यता असली पाहिजे. अध्यापक महाविद्यालयाची संख्या अटोक्यात असली की आपोआप बेकारीची समस्या सुटण्यासाठी मदत होईल. दरवर्षी लाखो विद्यार्थी शिक्षक पदव्या घेऊन बाहेर पडतात. पण नोकरी सर्वांना मिळत नाही. त्यासाइी गरज व त्यानुसार किती शिक्षक हे वरीष्ठ प्रशासनाकडून अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे. शिवाय ह्या अध्यापन शिक्षणाबरोबर स्वयंरोजगाराचे प्राथमिक धडे त्यांना मिळायला हवे. व्यावसायिक कौशल्य व क्षमता वाढीसाठी विशेष उपक्रम या काळात हवेत.

शिक्षकाव्दारे वर्गात जे काही शिकवले जाते त्याची माहिती इंटरनेटवरही उपलब्ध असते. वर्गात येणे व मुक्तपणे शिकवणे ही परंपरा बदल होणे आवश्यक आहे. यात आज अनुभवांची भर पडणे गरजेचे आहे. शिक्षकाने आता मेन्टॉर या भूमिकेत असेल तर विद्यार्थ्यांना ते हवे आहे. केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देणारा नाही तर ध्येय निश्चितीला मदतनीस हवा आहे. केवळ पदवी व पदव्युत्तर पदवी मिळेपर्यंत शिकवणारा शिक्षक व आयुष्यात धेयप्राप्तीसाठी प्रेरणा देणारा शिक्षक यात विद्यार्थ्यांची पसंती दुसऱ्या पर्यायाला आहे. शाळेतील शिक्षण हे अत्यंत मोलाचे आहे.

तुमची इच्छा असो वा नसो, तुम्ही सावध असा व नसा जीवनाच्या शाळेतील शिक्षणप्रक्रिया सातत्याने चालूच राहते. यात अनेक प्रभावी मार्गदर्शक प्रेरणास्त्रोत मिळतात. या मार्गदर्शकामुळे भावी वाटचाल सुखकर बनते. हे मार्गदर्शक बनण्याचे काम आव्हानात्मक आहे पण अवघड नाही. मानसिकता, काम करण्याची पध्दती कामाप्रती आवड व निष्ठा ह्या सर्व गोष्टी अध्यापक विद्यालयातच रुजल्या पाहिजे.

सतत नाविन्याचा शोध घेणे, कार्यात नवनवीन प्रयोग करणे ह्य गोष्टी अध्यापकाने सतत केल्या पाहिजे. सर्जनशीलता यातून वाढीस लागते, याशिवाय अध्यापकाकंकडून प्रेरणा घेऊन अनेक विद्यार्थ्यांना स्फूर्ती मिळते. अध्यापन कौशल्य, वर्तन बदल विविध पध्दती अध्यापनाची वैशिष्ट्ये नियोजन, दृकश्राव्य व तंत्रज्ञानाचा वापर, निष्ठापूर्वक काम सतत प्रयोगशील राहणे ह्या गोष्टी प्रयत्नाने मिळवता येतात. ह्या प्रकारची ध्येयनिष्ठा मात्र रुजवावी लागते व ती रुजवण्यासाठी उत्कृष्ट प्रकारे काम करणारी अध्यापक विद्यालये तयार व्हावी शिवाय अभ्यासक्रमासाठी लागणारा वेळ हा अत्यंत कमी आहे. त्यासाठी किमान तीन वर्षाचा पदवी वा पदव्युत्तर कोर्स हवा. ज्या गोष्टी भौतिक नव्हे तर मानसिकरित्या विद्यार्थ्यांच्या गळी उत्तरावयाच्या त्यासाठी वेळ हा खूप महत्त्वाचा आहे.

सद्यस्थितीला 'रात्र थोडी सोंगे फार' अशी अवस्था आहे. घाईघाईत सर्व उपक्रमाचे नियोजन करुन कार्यक्रमाची सांगता केली जाते. पण समाजावर संस्कार करणारा एकमेव शिक्षकच असतो. त्यासाठी आपण मनापासून काय केले पाहिजे हे ठरवले पाहिजे.

बहुसंख्य अध्यापक महाविद्यालये आज तज्ञ मनुष्यबळ, साधनसामग्री, विविध प्रकारच्या प्रयोगशाळा व इतर अनेक प्रकारच्या अभावांनी ग्रस्त आहे. वाढती संख्या व घटता दर्जा हे समीकरण अनेक अध्यापक महाविद्यालयांना तंतोतंत लागू पडते. शिक्षणशास्त्र ही मातृविद्याशाखा असल्याने अध्यापक शिक्षणाची जबाबदारी समर्थपणे पेलून मोठ्या प्रमाणावर शिक्षक घडविण्यासाठी समांतर व्यवस्था असायला हवी. एखाद्या व्यक्तीच्या अंगी असलेल्या कौशल्यांचा, क्षमतांचा व अभिक्षमतांचा व वैशिष्टयांचा अभ्यास करुन आवश्यकतेनुसार त्यांचा विकास करणे शक्य आहे. प्रत्येकाच्या प्राविण्याचा स्तर हा व्यक्तीभिन्नतेनुसार वेगळा राहू शकतो. परंतू थोडी फार जन्मजात शिक्षकी अभियोग्यता असलेल्या व्यक्तीस शिक्षक बनविता येते. कोणत्याही सैध्दांतिक परीक्षेत उत्तम गुण प्राप्त करणे व उत्तम प्रकारे अध्यापन करणे या दोन बाबी भिन्न आहेत. यशस्वी अध्यापक होण्यासाठी संबंधित विषयाच्या ज्ञानाबरोबरच उत्तम संप्रेषण कौशल्ये आवश्यक आहे. कोणत्याही देशाची प्रगती ही या त्या देशातील संरक्षण व्यवस्था व शिक्षणव्यवस्था यावर अवलंबून असते. ज्या देशाच्या या दोन्ही व्यवस्था भक्कम त्या देशाची प्रगती होते व तो देश प्रबळ होतो. ज्या देशाच्या या दोन्ही व्यवस्था कमकुवत आहेत तो देश भरकटलेल्या अवस्थेत असतो. आपल्या शिक्षण पध्दतीत पुष्कळ उणीवा आहेत. एका बाजूने जनतेला व सरकारला शिक्षणात गुणवत्ता असली पाहिजे असे वाटते व दुसऱ्या बाजूला गुणवत्तेला बाधा आणणारे निर्णय घेतले जातात. शिक्षकांकडे गुणवत्ता नाही. अशी ओरड सर्वत्र केली जाते. परंतु शिक्षकाचे शिक्षण प्रशिक्षण, मानसिकता, कौशल्यप्राप्ती व इतर महत्त्वपूर्ण गोष्टींचा विचार शैक्षणिक धोरणात व्हायला हवा व त्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास बरीचशी प्रगती घडून येईल. त्यासाठी आपण सर्वजण निश्चितपणे प्रयत्न करुया.

### *संदर्भ :*

१.पारसनीस न. रा., (१९९२) शिक्षकांचे प्रशिक्षण, नूतन प्रकाशन, पुणे.
२.दुनाखे व सौ,पारसनीस, शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन, नूतन प्रकाशन, पुणे-३०.
३.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नोट्स, अध्यापक व अध्यापक शिक्षक, नाशिक
४.जोशी एस.टी., कपोले अ.लो., भानगरावकर सुलभा, शिक्षक प्रशिक्षण आव्हाने, राज्यस्तरीय शैक्षणिक चर्चासत्र, २३ फेब्रुवारी १९९५.
५.पाटील लिला (१९९५) आजचे शिक्षण आजची समस्या, नूतन प्रकाशन, पुणे-३०.
६.कडेपूरकर हर्षवर्धन, (५ सप्टेंबर २००८) महाराष्ट्र टाईम्स कात्रण
७.भुसारी रुपाली, जीवनशाळेतील मेन्टॉर (२० ऑक्टोंबर २०१०) दैनिक लोकसत्ता कात्रण.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net